# कार्यालय जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

E-Mail id gadzpaurangabad@gmail.com

**दुरध्वनी क्र.** ०२४०-२३२९७१४, Fax No. ०२४०-२३३५५७३

संकेत स्थळ - www.aurangabadzp.gov.in


जा.क्र./जिपछसं/साप्रवि/प्रशासन-१/कावि/२०२५/२८५८ दिनांक:- २९.०८.२०२५

**महत्वाचे**

**शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि. १७.०७.२५ मधील परिच्छेद (II), (III), (IV) नुसार अनुकंपा नियुक्तीसाठी उमेदवारांची इच्छुकता अर्ज / पत्र घेणे व इच्छुकता यादी ठेवणे याबाबत जबाबदारी निश्चित करुन देणे बाबत**

**परिपत्रक**

---

**विषय :- अनुकंपा नियुक्तीसाठी उमेदवारांची इच्छुकता अर्ज / पत्र घेणे व इच्छुकता यादी ठेवणे याबाबत जबाबदारी निश्चित करुन देणे बाबत.**

**संदर्भ :-** १. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग अकंपा/१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ. दि. १७.०७.२५

२. शासन निर्णय गामविकास विभाग अकंपा-२०२५/प्र.क्र.४४२/आस्था-७ दि. ३१.०७.२५

संदर्भिय क्र. ०१ चे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि. १७ जुलै २०२५ अन्वये अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारित धोरण लागु केले असून संदर्भिय क्र. ०२ चे शासन निर्णय ग्रामविकास विभाग दि. ३१ जुलै २०२५ अन्वये सदर शासन निर्णयातील बदल वगळता उर्वरित सर्व तरतूदी जशा आहेत तशा सर्व जिल्हा परिषद गट-क व गट-ड कर्मचा-यांना लागू करण्यात आलेल्या आहेत.

संदर्भिय क्र. ०१ चे शासन निर्णयातील परिच्छेद (II), (III), (IV) नुसार शासकीय कर्मचा-याच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबास अनुकंपा योजनेची माहिती कार्यालयप्रमुख यांनी देणे, मृत शासकीय अधिकारी / कर्मचा-याच्या कुटुंबाने करावयाची कार्यवाही व कार्यालय प्रमुखाने करावयाची कार्यवाही निश्चित करुन देण्यात आलेली आहे.

- सदर शासन निर्णयातील परिच्छेद (II) नुसार शासकीय कर्मचा-याच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबास अनुकंपा योजनेची माहिती देण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यालयप्रमुख यांचे जबाबदारी निश्चित करुन देण्यात आलेली आहे.
  १. शासकीय कर्मचा-याच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबाकडून कुटुंबनिवृत्तीवेतनाचा लाभ देण्याच्या अनुषंगाने कागदपत्रे भरुन घेत असताना, त्यांना त्याचवेळी प्रत्यक्ष **अनुकंपा योजनेची माहिती द्यावी.**
  २. **योजनेची माहिती देतानाच,** सदर शासन निर्णयातील **"परिशिष्ट-ब"** येथील विहित नमुन्यात **इच्छुकता पत्र हे त्यांच्याकडून भरुन घेणे.** तसेच इच्छुक नसल्यास तसे पत्र भरुन घेणे. इच्छुकता पत्र भरुन घेतल्याची पोच पावती देणे.
  ३. कुटुंबास शासन निर्णयातील **"परिशिष्ट-क"** येथील **परिपूर्ण अर्जाचा नमुना कागदपत्राची तपासणी सूची देणे व त्याच्याकडून त्याबाबतची दिनांकित पोच पावती घेणे.**
- सदर शासन निर्णयातील परिच्छेद (III) (२) नुसार कुटुंबाने इच्छुकता पत्र सादर केल्याच्या दिनांकापासून ०३ वर्षाच्या मुदतीत अनुकंपा नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज कार्यालय प्रमुखास सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा कुटुंबियाचे नाव इच्छुकता यादीतून वगळण्यात येईल अशी तरतूद समाविष्ट करण्यात आलेली आहे.

- तसेच सदर शासन निर्णयातील परिच्छेद (IV) नुसार कार्यालयप्रमुखाने इच्छुकता पत्र भरुन घेतल्यानंतर, अशा इच्छुक उमेदवारांची एक स्वतंत्र यादी कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्याबाबत सूचना आहेत.

जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर अंतर्गत पंचायत समिती कार्यक्षेत्रातील तालुका कार्यालय जसे तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, गटशिक्षणाधिकारी कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, पाणीपुरवठा / बांधकाम उपविभाग, पशुवैद्यकिय दवाखाना, एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय येथील जिल्हा परिषद अधिकारी / कर्मचारी यांचे मृत्यूनंतर शासन निर्णयातील परिच्छेद (II), (III), (IV) नुसार विहित मुदतीत त्याच्या कुटुंबास अनुकंपा योजनेची माहिती देणे, कुटुंबायीकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त करुन घेणे, इच्छुकता पत्र भरुन घेणे, इच्छुकता पत्र भरुन घेतल्यानंतर अशा इच्छुक उमेदवारांची एक स्वतंत्र यादी जतन करुन ठेवणे, इच्छुकता यादीमधून नाव वगळणे या सर्व बाबींसाठी त्या त्या कार्यालयाचे कार्यालयप्रमुख यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्याप्रमाणे जिल्हास्तरावरील कार्यालयासाठी वरीलप्रमाणे कार्यवाहीसाठी संबंधित खातेप्रमुख / विभागप्रमुख यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे कार्यालयप्रमुख यांनी त्यांचेकडील इच्छुकता पत्राची एकत्रित यादी स्वतंत्ररित्या जतन करुन वेळोवेळी अद्याव करावी व त्याची प्रत जानेवारी, एप्रिल, जुलै, ऑक्टोबर महिन्याच्या ०१ तारखेला गट विकास अधिकारी यांना सादर करावी.

गट विकास अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयातील प्राप्त इच्छुकता पत्र व तालुक्यातील कार्यालयप्रमुख यांचेकडून प्राप्त होणाऱ्या इच्छुकता पत्राची यादी एकत्रित करुन सदर यादी स्वतंत्ररित्या जतन करुन ठेवण्यात यावी तसेच सदरचे कामकाज आस्थापना शाखेकडे देण्याची व अनुकंपा नियुक्ती बाबत एकत्रित इच्छुकता यादी त्रैमासिक अहवालाद्वारे सामान्य प्रशासन विभागास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

तसेच जिल्हास्तरावरील कार्यालयाने त्यांचेकडील प्राप्त इच्छुकता पत्राची यादी त्यांचेस्तरावर ठेवण्यात येऊन वेळोवेळी अद्यावत करावी व त्याची प्रत दर तीन महिण्यानी सामान्य प्रशासन विभागास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

वरीलप्रमाणे आपल्या कार्यक्षेत्रातील अनुकंपा नियुक्तीचे प्रकरणामध्ये सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी काटेकोरपणे करुन अहवाल वेळोवेळी सादर करावा.

28/8/25

**अंकित (भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर**

**प्रतिलिपी माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव**

१. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर
२. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर
३. **सर्व खाते प्रमुख जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव**
४. **सर्व गट विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व) यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव**
४. संकेतस्थळावर व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी